सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १०५ | सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन


**श्री. आशिष चौधरी**
पतंजली डिस्ट्रीब्युटर्स, अमळनेर


**श्री. राधेश्याम अग्रवाल**
सीए, पुणे


**श्री. राजेंद्र देशमुख**
सामाजिक कार्यकर्ता

## दिनविशेष
५ जानेवारी

- छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांकडून साल्हेर काबीज केले.
- दर्पण या मराठी वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला.
- महाड महानगरपालिकेने चवदार तळे अस्पृश्य लोकांसाठी खुला केला.
- पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) सुरू झाली.
- विक्रीकर कायदा लागू झाला.

## प्रशासनाच्या नाकावर टिच्चून (की आशीर्वादाने?) सुरू असलेली वाळू चोरी...!


अमळनेर : तालुक्यातील मुंगसे गावानजीक नदीपात्रातून काठावरील कोरून माती भरताना तर काही पाण्यातून अवैध वाळू ट्रॅक्टरमध्ये भरताना मजूर.


अमळनेर : मुंगसे व सावखेडा रस्त्याची अवैध वाळू वाहतूकीमुळे झालेली दुरवस्था


अमळनेर : वाळू उपसासाठी महसूल विभागाने ठरवून दिलेला ताबा दिलेल्या लाल झेंड्याच्या खूणा.

अमळनेर : दिवसा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करताना ट्रॅक्टर


अमळनेर : मुंगसे नदीपात्रातील वाळू वाहतूकीसाठी रस्ता तयार करण्यासाठी नदीकाठावरील डोंगर कोरून माती ट्रॅक्टरमध्ये भरताना मजूर.


अमळनेर : सावखेडा गावानजीक नदीपात्राच्या कोपऱ्यात अवैध वाळूचा जमा केलेला साठा.

# खा.शि. ची निवडणूक; ६६.४७ टक्के मतदान शांततेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी रविवार, दि. ४ जानेवारी रोजी प्रताप महाविद्यालयात ६६. ४७ टक्के मतदान शांततेत झाले. एकूण ५ हजार ४९२ मतदारांपैकी ३ हजार ६५१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दिवसभरात कोणतीही वादावादी झाली नाही. मतदान शांततेत पार पडले.

सकाळी आठ वाजेपासून मतदानास सुरूवात झाली. दहा बूथवर ७० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. दुपारी २ वाजेपर्यंत २९. २२ टक्के, दुपारी तीन वाजेपर्यंत ३७. ६७ टक्के, दुपारी ४ वाजेपर्यंत ४६ टक्के मतदान झाले. त्यानंतर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाची निर्धारीत वेळ होती. पाच वाजेपर्यंत मतदान केंद्रस्थळी आलेल्या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता आला. मात्र, त्यांची संख्या जास्त असल्याने सहा वाजेनंतरही मतदान प्रक्रिया सुरू होती.

**प्रताप महाविद्यालयाला यात्रेचे स्वरूप**

सकाळपासूनच उमेदवार व त्यांचे समर्थकांची लगबग दिसून आली. उमेदवार मतदान केंद्र परिसरात एका रांगेत उभे राहून मतदारांना मतदानासाठी आवाहन करत होते. आशीर्वाद पॅनल व परिवर्तन पॅनलचे उमेदवार आमने सामरे उभे होते. उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्रांवर आणण्यासाठी व मतदान झाल्यानंतर सोडण्यासाठी वाहनांची व्यवस्था केली होती. वृद्ध, अपंग आदींसाठीही विशेष व्यवस्था करण्यात आली होती. उमेदवार, समर्थकांच्या गर्दीमुळे महाविद्यालय परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

**आज मतमोजणी**

सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी इंदिरा भुवन येथे सकाळी नऊ वाजेपासून मतमोजणीस सुरूवात होणार आहे. ८ टेबलवर मतमोजणी होईल. यासाठी ४८ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. १ हजार मतांची एक फेरी या नुसार मतमोजणी होईल.

# वाळूने भरलेला डंपर पकडला आणि सोडला



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील आर. के. नगरजवळील पेट्रोल पंपानजीक रविवार, दि. ४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास वाळू वाहतूक करणारा एक डंपर पोलिसांनी पेट्रोलिंगदरम्यान पकडला. त्यावेळी डंपरचा मालक घटनास्थळी उपस्थित नव्हता. पोलिसांनी डंपर मालकास बोलावून तहसीलदार रुपेश कुमार सुराणा यांना माहिती दिली. डंपर मालकाने वाळू वाहतुकीबाबतचे चलन घटनास्थळी आणून दाखवले. सदर चलन तहसीलदार रुपेश कुमार सुराणा यांना दाखविण्यात आले. तहसीलदार श्री. सुराणा यांनी कागदपत्रांची तपासणी केली.

"तहसीलदारांच्या आदेशानुसार संबंधित वाळूचे डंपर सोडण्यात आला. डंपर पंचर झाल्यामुळे तो त्या ठिकाणी उभा होता. आमच्या परीने आम्ही योग्य ती छानबिन केली आहे.
**शरद काकळीज,** ए.पी.आय., अमळनेर.

"वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरची माहिती मिळाली. त्या वेळी मी वैद्यकीय कामासाठी बाहेरगावी गेलो होतो. जळोद व हिंगोणेसिम येथे जप्त केलेल्या वाळूचा साठा आहे. आता मी प्रवासात आहे. सदर प्रकरणाबाबतची सविस्तर माहिती मी आपणास उद्या देईन.
**रुपेशकुमार सुराणा,** तहसीलदार, अमळनेर.

***बात कुछ हजम नही हो रही..!***

*सदर डंपर बाबत कुणीतरी पोलीसांना कळविल्याने पोलीस घटनास्थळी पोहचले. डंपरशी संबंधित झालेली कारवाई, डंपर मालकाचे दि. २ जानेवारीचे चलन पाहता बात कुछ हजम नही हो रही अशी स्थिती आहे.*



# डॉ. डिगंबर महाले यांची महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या

## गव्हर्निंग कौन्सीलमध्ये निमंत्रित सदस्यपदी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चर ही राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठीत आणि शिखर संस्था आहे. सदर संस्थेत राज्यातील अग्रगण्य उद्योजक व व्यावसायिक सदस्य आहेत. संस्थेच्या पदाधिकारीपदीही अत्यंत महनीय व्यापारी व उद्योजक आहेत. या संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सीलमध्ये निमंत्रित सदस्यपदी (स्पेशल इन्व्हायटी) डॉ. डिगंबर महाले यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी डॉ. महाले यांना याबाबतचे नियुक्तीपत्र दिले आहे. अमळनेरच्या इतिहासात प्रथमच हा बहुमान डॉ. महाले यांच्या निमित्ताने मिळाला आहे.

पुढील वर्षी संस्थेच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होत आहेत. हा ऐतिहासिक टप्पा उद्योग, व्यापार व विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार आहे. त्यासाठी आतापासूनच संस्थेने जय्यत तयारी सुरू केली आहे. सदर भव्य कार्यक्रमाच्या आयोजन व नियोजन संदर्भात दीर्घानुभवी व्यक्तिमत्व जबाबदार पदी असावे यासाठी डॉ. महाले यांची ही विशेष नियुक्ती करण्यात आली आहे. अनेक मान्यवरांनी डॉ. महाले यांचे अभिनंदन केले आहे.

# 'सॉरी सर' चालणार नाही!

## गाडीवर 'एचएसआरपी' नसेल तर आरटीओचे 'हे' महत्त्वाचे काम कायमचे अडणार!

**ग्लोबाल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर** : महाराष्ट्रात हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसवण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपल्यानंतर, १ जानेवारी २०२६ पासून राज्यभरात कडक अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे.

आरटीओ आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्त कारवाई सुरू करत फॅन्सी, स्टायलिश किंवा अनधिकृत नंबर प्लेट लावलेल्या वाहनांवर लक्ष केंद्रित केले आहे. 'दादा', 'भाऊ', 'राजे', 'साहेब' अशा मजकुराच्या प्लेट्स आता थेट कारवाईच्या कक्षेत आल्या आहेत.१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या सर्व जुन्या वाहनांना एचएसआरपी बसवणे केंद्र आणि राज्य सरकारने बंधनकारक केले होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असून, या प्लेट्समध्ये खास लेझर कोड आणि युनिक ओळख क्रमांक असतो.

# दिल्ली येथे मंगळ ग्रह सेवा संस्थेचा वाजला डंका..!

## आनंद महाले यांना समारंभपूर्वक केले सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था म्हणजे सामाजिक जाणिवेचे उचित भान असलेली संस्था आहे, हे दीर्घकाळापासून विविध प्रकारे सिद्ध झाले आहे. दिल्ली येथे देशातील अग्रगण्य समाजसेवी संस्थांच्या (एनजीओ) कार्यक्रमात संस्थेचे एकूणच कार्य पाहून संस्थेला मानाची ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

संस्थेच्या वतीने विश्वस्त तथा दै. ग्लोबल महातेजचे संपादक आनंद महाले यांनी संस्था व श्री मंगळग्रह मंदिर यांनी केलेले व करीत असलेल्या सर्व कार्याची पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या साह्याने इत्यंभूत माहिती दिली. उपस्थित प्रतिष्ठीत संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार टाळ्यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. एनजीओच्या क्षेत्रातील दिग्गज मानले जाणारे राजेश वर्मा यांच्या शुभहस्ते आनंद महाले यांना शाल, श्रीफळ व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित देशभरातील अनेक मान्यवरांनी मंदिराला भेट देण्याची तथा समक्ष येऊन संस्थेचे कार्य पाहण्याची इच्छा व्यक्त केली.





# चाय बेचने वाला का बेटा बना आयएएस

## सक्सेस स्टोरी सेल्फ स्टडी के दम पर ३ बार क्रैक की यूपीएससी परीक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिमांशु गुप्ता उत्तराखंड के रहने वाले हैं। वे ऐसे परिवार से आते हैं, जो आर्थिक रूप से काफी कमजोर है। लेकिन फिर भी उन्होंने अपनी पढ़ाई नहीं छोड़ी और सेल्फ स्टडी के दम पर तीन बार यूपीएससी सीएसई की परीक्षा पास कर ली।

संघ लोक सेवा आयोग की सिविल सेवा परीक्षा काफी टफ होती है। लेकिन कई लोग हैं जो मुश्किल हालात के बाद भी इस परीक्षा में सफलता हासिल कर लेते हैं। सभी की कहानी अलग होती है। ऐसे में आज आईएएस हिमांशु गुप्ता की कहानी जानेंगे, जो सभी के लिए मिसाल पेश करती है। हिमांशु गुप्ता उत्तराखंड के रहने वाले हैं। वे ऐसे परिवार से आते हैं, जो आर्थिक रूप से काफी कमजोर है। लेकिन इसके बाद भी उन्होंने हार नहीं मानी और गरीबी जैसी चुनौती से लड़ते हुए यूपीएससी परीक्षा में सफलता हासिल कर ली।

**चाय बेचकर पिता ने पढ़ाया**

हिमांशु का जन्म उत्तराखंड के सितारगंज में एक गरीब परिवार में हुआ था। उनके पिता सड़क किनारे चाय बेचकर परिवार चला रहे थे. ऐसे में हिमांशु का बचपन गरीबी और तंगी में गुजरा। लेकिन उनके अंदर पढ़ने का जुनून था। यही कारण है कि उन्होंने कभी गरीबी को अपने रास्ते का काटा नहीं बनने दिया और हमेशा पढ़ाई जारी रखी।

**दिल्ली यूनिवर्सिटी से हुई पढ़ाई**

हिमांशु गुप्ता की पढ़ाई दिल्ली यूनिवर्सिटी के हिंदी कॉलेज से हुई है। उन्होंने हिंदू कॉलेज से ग्रेजुएशन और फिर जवाहर नेहरू विश्वविद्यालय से पोस्ट ग्रेजुएशन की डिग्री हासिल की। उन्होंने यूपीएससी की तैयारी शुरू और साथ ही परिवार के लिए सहारा बनने के लिए कॉलेज में पढ़ाने का काम भी शुरू किया।

**बिना कोचिंग के यूपीएससी की तैयारी**

हिमांशु गुप्ता ने गरीबी के कारण यूपीएससी की तैयारी के लिए कोचिंग नहीं बल्कि सेल्फ स्टडी को चुना। सेल्फ स्टडी के दम पर आयएएस हिमांशु गुप्ता ने ३ बार यूपीएससी परीक्षा में सफलता हासिल की। पहले प्रयास में उनका चयन रेलवे सेवा में हुआ. दूसरे प्रयास में वह आयपीएस ऑफिसर बने। साल २०२० के अपने तीसरे प्रयास में, उन्होंने ऑल इंडिया रैंक एआयआर १३९ हासिल कर आयएएस की पोस्ट हासिल की।


**कौन हैं हिमांशु गुप्ता की पत्नी?**

हिमांशु गुप्ता की पत्नी आयपीएस हैं। उनका नाम है शिवा सिंह. इन दोनों की जोड़ी बेहद खूबसूरत है। ये दोनों कपल उस वक्त चर्चा में आए जब हिमांशु गुप्ता अपनी पत्नी के प्रमोशन से संबंधित कार्यक्रम में उत्तर प्रदेश के कानपुर नगर कमिश्नरी में पहुंचें।

### आईएएस अफसरों पर सवाल जवाब

- **आयएएस हिमांशु गुप्ता की पत्नी कौन है?**
आईएएस हिमांशु गुप्ता की पत्नी का नाम शिवा सिंह है।
- **हिमांशु गुप्ता कौन हैं?**
हिमांशु गुप्ता उत्तराखंड के रहने वाले हैं। उन्होंने यूपीएससी सीएसई २०२० में सफलता हासिल की थी।
- **हिमांशु गुप्ता ने कितनी बार यूपीएससी परीक्षा क्रैक की है?**
हिमांशु गुप्ता ने ३ बार यूपीएससी की परीक्षा पास की है। दूसरी बार में उन्हें आयपीएस कैडर मिला था और तीसरी बार में आईएएस।
- **हिमांशु गुप्ता ने किस साल में यूपीएससी में क्रैक की थी?**
हिमांशु गुप्ता ने सीएसई २०२० में सफलता हाासिल की थी।
- हिमांशु गुप्ता की यूपीएससी में रैंक क्या थी?
हिमांशु गुप्ता की यूपीएससी सीएसई २०२० में रैंक १३९ वीं हासिल की थी।

हिमांशु गुप्ता ने किस कॉलेज से पढ़ाई की है?
हिमांशु गुप्ता ने दिल्ली यूनिवर्सिटी के से पढ़ाई की है।






## १५० चित्रपटांमध्ये स्थान मिळविणारा एकमेव चित्रपट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'दशावतार' हा कोकणच्या मातीतील चित्रपट आता थेट ऑस्करवारीला पोहोचला आहे. ९८ व्या ऑस्कर पुरस्कारांच्या मुख्य स्पर्धेत या चित्रपटाची निवड झाली आहे. २०२५ मध्ये सर्वाधिक गाजलेला मराठी सिनेमा म्हणजे 'दशावतार' या चित्रपटाने प्रेक्षकांना वेड लावले. कोकणाचा राखणदार आणि तेथील खरा दशावताराचा खेळ खऱ्या अर्थाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचविला. 'दशावतार' या चित्रपटाने इतिहास रचला आहे. ९८ व्या ऑस्कर पुरस्कारांच्या मुख्य स्पर्धेत या चित्रपटाची अधिकृत निवड झाली आहे. जगभरातील हजारो चित्रपटांतून निवडल्या गेलेल्या १५० चित्रपटांमध्ये स्थान मिळविणारा हा एकमेव मराठी चित्रपट ठरला आहे. या चित्रपटाचे सुबोध खानोलकर दिग्दर्शक आहेत.

खानोलकरांच्या मते कष्टाचे, प्रामाणिकपणाचे, मोठे स्वप्न पाहण्याचे चीज होतेच. फक्त कामावर विश्वास हवा. खाली मान घालून कष्ट करत राहण्याची चिकाटी हवी, पडल्यावर पुन्हा उभे राहण्याची जिद्द हवी आणि विश्वास ठेवणाऱ्या माणसांची खंबीर साथ हवी. आज 'दशावतार' ऑस्करच्या म्हणजेच ॲकॅडमी अवार्डसारख्या मुख्य स्पर्धेत निवडला गेल्याचा मेल आला आणि गेली अनेक वर्षे आम्ही सगळ्यांनी जी मेहनत घेतली त्याची दखल घेतली गेल्याचे समाधान मिळाले. हे समाधान फक्त 'दशावतार' निवडला गेला आहे म्हणून नाही, तर आपला मराठी चित्रपट जागतिक स्तरावर तोडीस तोड उभा राहू शकतो, हे पुन्हा एका सिद्ध होत आहे.

मुख्य स्पर्धेच्या कॅटेगिरीत निवडला गेलेला 'दशावतार' हा बहुधा पहिलाच मराठी चित्रपट आहे. हजारो चित्रपटांतून जे १५० प्लस चित्रपट निवडले गेले त्यातील हा एकमेव चित्रपट आहे आणि ॲकॅडमी स्क्रीनिंग रूममध्ये दाखविला जाणारा पहिलाच मराठी चित्रपट आहे.

### जिंकणे-हरणे नंतरची गोष्ट

*मुख्य जागतिक प्रवाहात मराठी चित्रपटाची दखल घेतली जाणे हे प्रचंड अभिमानास्पद आहे. ही फक्त सुरूवात आहे, आम्ही सातत्याने चांगले काहीतरी तयार करण्याचा आणि ते जगासमोर आणून मराठीची मान उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत राहू. प्रेम आणि आशीर्वाद असू द्या.*

**संकर्षण कऱ्हाडे 'सिरीयस सीनचा विनोद'**

'दे धक्का' चित्रपटात एक सीन होते. जिथे त्याला रडायचे होते.शूटिंग सुरू होताच कुणीतरी मागून हळूच म्हटले, की संकर्षणा, अश्रू कमी पडले तर प्याज देतो. तो हसू थांबवू शकला नाही आणि डायरेक्टरने पुन्हा टेक दिला.



**विजय चव्हाण 'गणपतीतला किस्सा'**

एका गणपती मंडळात विजय चव्हाण गेले होते. तेथे एक मुलगा म्हणाला, की काका, तुम्ही 'चालू काय पायात' मध्ये फार हसवले. विजय म्हणाले, की हो, पण आता पायात चप्पल नाही.



# ॲंटिबायोटिक्सचा अतिवापर आणि रोगप्रतिकारशक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घसा दुखला, सर्दी-खोकला झाला, ताप आला, की अनेक जण लगेच ॲंटिबायोटिक घेतात. काही वेळा डॉक्टरांकडून, तर कधी स्वतःहून. काही दिवसांनी बरे वाटते. पण नंतर पुन्हा आजार डोके वर काढतो. फंक्शनल मेडिसीनच्या दृष्टीने हा केवळ योगायोग नाही. वारंवार ॲंटिबायोटिक्स घेणे म्हणजे शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीवर थेट हल्ला करणे होय.

**ॲंटिबायोटिक्स नेमके काय करतात?**

ॲंटिबायोटिक्स वाईट जंतूंना मारण्यासाठी वापरली जातात. पण ती फक्त 'वाईट' जंतूच मारत नाहीत, तर आपल्या शरीरातील चांगले जंतूसुद्धा नष्ट करतात. विशेषतः आतड्यांतील मायक्रोबायोम यामुळे मोठ्या प्रमाणात बिघडतो. आपण जाणतो, की सुमारे ७० टक्के रोगप्रतिकारशक्ती आतड्यांमध्ये असते. म्हणजे आतड्यांतील चांगले जंतू नष्ट झाले, तर रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होणे स्वाभाविक आहे.

**आतड्यांचे नुकसान आणि 'लीकी गट'**

वारंवार ॲंटिबायोटिक्स घेतल्यामुळे आतड्यांची संरक्षक भिंत कमकुवत होते. याला 'लीकी गट' असे म्हटले जाते. यामुळे अर्धवट पचलेले अन्न, विषारी घटक रक्तात जातात आणि शरीर सतत सूज अवस्थेत राहते. याचा परिणाम म्हणून वारंवार सर्दी-खोकला, ॲलर्जी, त्वचेचे आजार, थकवा, पचनाच्या तक्रारी इत्यादी समस्या वाढू लागतात.

**व्हायरल आजारात ॲंटिबायोटिक्स-मोठी चूक**

सर्दी, फ्लू, घसा खवखवणे यांपैकी बहुतांश आजार व्हायरसमुळे होतात. ॲंटिबायोटिक्सचा व्हायरसवर काहीही परिणाम होत नाही. उलट ती रोगप्रतिकारशक्ती अजून कमकुवत करतात. फंक्शनल मेडिसिनमध्ये आजार बरा करणे इतकेच महत्त्वाचे नसून, पुढचा आजार टाळणे जास्त महत्त्वाचे मानले जाते.

**ॲंटिबायोटिक रेझिस्टन्स - भविष्यातील धोका**

वारंवार ॲंटिबायोटिक्स घेतल्यामुळे जंतू त्यांना दाद देईनासे होतात. यालाच ॲंटिबायोटिक रेझिस्टन्स म्हणतात. उद्या एखादा गंभीर संसर्ग झाला, तर नेहमीची औषधे काम करणार नाहीत, हा मोठा धोका आहे.

**फंक्शनल मेडिसीन काय वेगळे सुचवते?'**

फंक्शनल मेडिसीन ही प्रिवेंटिव केअरवर आधारित आहे. येथे ॲंटिबायोटिक्स पूर्णपणे नाकारले जात नाही; पण गरज असेल तेव्हाच वापरण्याचा आग्रह धरते. तसेच फंक्शनल मेडिसीन हे आतड्यांचे आरोग्य सुधारण्याकडे लक्ष देते. प्रोबायोटिक अन्न (दही, ताक, आंबवलेले पदार्थ) घेण्यावर भर देते. झोप पुरेशी असणे व ताण नियंत्रणात असणे यावर लक्ष देते. पोषणद्रव्यांची पूर्तता होण्याकडे भर देते.शरीराची अंतर्गत ताकद वाढते तेव्हा आजार आपोआप कमी होतात. ॲंटिबायोटिक्स तात्पुरता आराम देऊ शकतात; पण त्यांचा अतिरेक शरीराची नैसर्गिक संरक्षणव्यवस्था कमकुवत करतो. आज गरज आहे ती पटकन औषध घेण्याची नाही, तर शरीर बळकट करण्याची. खरी रोगप्रतिकारशक्ती गोळ्यांत नसते, ती आपल्या आतड्यांत आणि जीवनशैलीत असते.

# शाहरुखच्या 'केकेआर'ला मोठा धक्का!

## बांगलादेशच्या मुस्तफिजूरला 'आयपीएल'मधून काढले बाहेर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला कोलकाता नाइट रायडर्स संघातून वगळण्याचे निर्देश बीसीसीआयने दिले आहेत. शाहरुख खानच्या मालकीच्या कोलकत्ता नाइट रायडर्स (केकेआर) संघाला मुस्तफिजूरला रिलीज करण्यास सांगण्यात आले आहे. त्याच्या बदल्यात दुसरा खेळाडू घेण्याची परवानगीही बोर्डाकडून देण्यात आली आहे.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, की सध्याची परिस्थिती लक्षात घेता केकेआर संघाने मुस्तफिजूर रहमानला रिलीज करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. संघाला हवे असल्यास पर्यायी खेळाडू घेण्याची मुभा दिली जाईल.

**नेमके प्रकरण काय आहे?**

अलीकडे बांगलादेशमध्ये हिंदूंवर झालेल्या हिंसाचाराच्या घटनांमुळे भारतात असंतोष पसरला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो-व्हिडिओंमुळे संताप वाढला आणि अनेक संघटनांनी बांगलादेशी खेळाडूंना आयपीएल २०२६ मध्ये खेळू देऊ नये, अशी मागणी केली. या पार्श्वभूमीवर मुस्तफिजूर रहमानला केकेआर संघातून वगळण्याचा दबाव वाढला. या मुद्द्यावरून काही राजकीय नेत्यांनीही थेट शाहरुख खान केकेआर संघ व्यवस्थापनावर टीका केली होती. त्यामुळे हा विषय केवळ क्रिकेटपुरता मर्यादित न राहता राजकीय चर्चेचा मुद्दा बनला.

**'केकेआर'साठी जबरदस्त धक्का**

मुस्तफिजूर रहमानला केकेआर संघाने डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या मिनी लिलावात तब्बल ९.२० कोटी रुपयांना खरेदी केले होते. त्याची बेस प्राइस २ कोटी रुपये होती. चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्ससोबत चुरशीच्या बोलीनंतर केकेआर संघाने त्याला संघात घेतले होते. डेथ ओव्हर्समध्ये प्रभावी गोलंदाजी करणारा मुस्तफिजूर केकेआर संघासाठी 'मॅच विनर' ठरू शकतो, असा विश्वास संघ व्यवस्थापनाला होता.

**आयपीएलमधील अनुभव**

मुस्तफिजूर रहमान २०१६ पासून आयपीएल खेळत आहे. सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्स अशा अनेक संघांकडून तो खेळला आहे. आतापर्यंत ६० आयपीएल सामन्यांत त्याने ६५ विकेट्स घेतल्या आहेत.

**भारत-बागलादेश दौऱ्यावर प्रश्नचिन्ह?**

दरम्यान, भारताचा सप्टेंबर २०२६ मध्ये बांगलादेश दौरा प्रस्तावित आहे. त्यात तीन वन-डे आणि तीन टी-२० सामने खेळविले जाणार आहेत. मात्र सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे हा दौरा होणार की नाही, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. यावर बीसीसीआयकडून अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.



# हळदीचे पाणी की हळदीचे दूध? जास्त फायदे कशाने मिळतात??



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय घरांमध्ये हळदीचा वापर बऱ्याच प्रकारचे पदार्थ तयार करण्यासाठी केला जातो. हळद फक्त अन्नाला रंग देत नाही तर जेवणाची चवही वाढवते. हळदीचे सेवन आरोग्यासाठी बरेच फायदेशीर ठरते. म्हणूनच हेल्थ एक्सपर्ट्स पाण्यात हळद मिसळून ते पाणी पिण्याचा किंवा दूध पिण्याचा सल्ला देतात. हळदीच्या दुधाबरोबरच हळदीचे पाणी प्यायल्यानं ही तब्येतीला बरेच फायदे मिळतात. प्रसिद्ध अमेरीकन डॉक्टर एरिक बर्ग यांनी आपल्या युट्यूब चॅनेलवरून याबाबत एक व्हिडिओ शेअर केला आहे ज्यात त्यांनी हळदीचे पाणी पिण्याचे काही फायदे सांगितले आहेत.

**हळदीचे पाणी पिण्याचे फायदे**

डॉक्टर सांगतात की हळदीत करक्युमिनअसते. जे एक पॉवरफुल एंटी इंफ्लेमेटरी कंम्पाऊंड आहे. करक्युमिन सांध्यांतील वेदना सूज कमी करते. अनेकचा याचा परीणाम इबुप्रोफेन आणि एस्पिरिन यांसारख्या औषधांप्रमाणे असतो पण याचे कोणतेही साईड इफेक्ट्स नाहीत. अनेक संशोधनांतून समोर आले आहे की हळद ब्लड शुगर कंट्रोल करण्यास मदत करते. खासकरून टाईप २ डायबिटीस असल्यास रुग्णांसाठी फायदेशीर ठरते. हे शरीरात मेटाफॉर्मिनसारख्या औषधांप्रमाणे काम करते. कोणत्याही नुकसानांशिवाय खराब कोलेस्टेरॉल कमी करून हृदयाचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करते.

डॉक्टर सांगतात, की करक्युमिन सेरोटोनिन आणि डोपामाईन यांसारखे हॅप्पी हॉर्मोन्स वाढवतात. ज्यामुळे मूड चांगला राहतो चांगली झोप येते. म्हणून हळदीचे पाणी मानसिक आरोग्यासाठी उत्तम मानले जाते. हळदीचे पाणी प्यायल्याने पचनक्रिया मजबूत होते. गॅस, ॲसिडिटी यांसारख्या समस्या कमी होतात. आतड्यांमध्ये चांगले बॅक्टेरिया वाढतात. याशिवाय इम्यून सिस्टीम मजबूत होते. एक ग्लास हलक्या कोमट पाण्यात अर्धा चमचा हळद पावडर आणि चुटकीभर काळी मिरी मिसळा. तुम्ही चवीसाठी थोडा लिंबू किंवा मध घालू शकता. हळूहळू याचे सेवन करा. काळी मिरी हळदीतील पोषक तत्त्व योग्य पद्धतीने शोषण्यास मदत करते.

**हळदीचे पाणी कधी प्यावे?**

जर तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर जेवणाच्या आधी प्या. झोप, इम्युनिटीशी संबंधित समस्या असतील तर रात्री झोपण्याच्या आधी हे पाणी प्या. हळदीचे पाणी शरीराला आतून डिटॉक्स करते, सूज कमी करते, मन शांत ठेवते, इम्युनिटी वाढवते. पण कोणतेही घरगुती उपाय करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## अमळनेरला मैत्रीपूर्ण क्रीकेट स्पर्धा

# पत्रकार संघावर मात करत पोलीस संघाने मारली बाजी



अमळनेर : मैत्रीपूर्ण क्रिकेट सामन्यात पोलीस संघ विजयी झाल्यानंतर जल्लोषप्रसंगी पोलिस उपाधिक्षक विनायक कोते, पीआय दत्तात्रय निकम व पोलीस संघ व पत्रकार संघाचे खेळाडू.

### आमदार अनिलदादा पाटलांची उपस्थिती


या मैत्रीपूर्ण क्रिकेट सामन्याचा आनंद घेण्यासाठी आमदार अनिलदादा पाटील यांनी विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी खेळाडूंचे कौतुक करून उत्साह वाढवला. सामन्याचे पंच म्हणून एस. पी. वाघ, रिंकू पवार, सुफियान तेली, सय्यद अबुजर यांनी काम पाहिले. श्लोक बागुल यांनी स्कोरर म्हणून तर संजय पाटील यांनी सूत्रसंचलन केले. सहायक पोलीस निरीक्षक जीभाऊ पाटील, फिरोज बागवान, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष डॉ. समाधान मैराळे, सुरेश कांबळे, प्रा. डॉ. विजय गाढे, नूर खान, आत्माराम अहिरे, मिलिंद पाटील, हवालदार सिद्धांत सिसोदे, मिलिंद सोनार यांच्यासह पोलीस व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस आणि पत्रकारदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी प्रताप महाविद्यालयाच्या मैदानावर मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धा झाली. यात पोलीस संघाने पत्रकार संघावर मात करून दणदणीत विजय मिळविला.

पोलीस संघाचे कर्णधार पोलीस उपअधीक्षक विनायक कोते यांनी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीस पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम आणि हवालदार प्रल्हाद सूर्यवंशी मैदानात उतरले. पत्रकार संघाचे गोलंदाज आर. जे. पाटील यांनी निकम यांची महत्त्वपूर्ण विकेट घेऊन सुरुवातीला पोलीस संघाला धक्का दिला. मात्र, त्यानंतर प्रल्हाद सूर्यवंशी यांनी मैदानाचा ताबा घेतला. त्यांना पीएसआय समाधान गायकवाड यांनी ४९ धावांची उत्तम साथ दिली. सूर्यवंशी यांनी प्रताप महाविद्यालयाच्या मैदानात चौफेर फटकेबाजी करत नाबाद ८२ धावा केल्या. पोलीस संघाला १६८ धावांच्या भक्कम धावसंख्येपर्यंत पोहोचवले. १६८ धावांचा पाठलाग करताना पत्रकार संघाकडून महेंद्र पाटील व उमेश काटे यांनी डावाची सावध सुरुवात केली. त्यानंतर आर. जे. पाटील, प्रवीण बैसाणे, मुन्ना शेख, राहुल भदाणे, किरण पाटील, निरंजन पेंढारे, गणेश चव्हाण, कमलेश वानखेडे, रिजवान मणियार यांनी फटकेबाजीचा प्रयत्न केला.

मात्र, पोलीस संघाचे गोलंदाज पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक निकम, हवालदार शेखर साळुंखे, मंगल भोई, मयूर पाटील, विनोद संदानशिव आणि चरण पाटील यांच्या शिस्तबद्ध आणि भेदक माऱ्यापुढे पत्रकार संघाची फलंदाजी कोसळली. उत्कृष्ट क्षेत्ररक्षण आणि अचूक गोलंदाजीमुळे पोलीस संघाने या सामन्यावर विजय मिळविला. प्रल्हाद सूर्यवंशी मॅन ऑफ दी मॅच उत्कृष्ट फलंदाजीबद्दल प्रल्हाद सूर्यवंशी यांना 'मॅन ऑफ द मॅच', अचूक टप्प्यावर गोलंदाजी केल्याबद्दल राहुल पाटील 'उत्कृष्ट गोलंदाज'तर उत्कृष्ट कॅच मंगल भोई यांनी घेतल्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. सुरुवातीला क्रिकेट कोच रिंकू पवार यांनी दोन्ही संघांना नियम समजावून सांगितले.



अमळनेर : अभ्यासिकेला एलईडी भेट देताना विजय चौधरी, शेजारी उपस्थित मान्यवर.

## चिमणपुरी- पिंपळेत डिजिटल अभ्यासिकेचे उद्घाटन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील चिमणपुरी-पिंपळे येथील श्री गुरुदेव दत्त संस्थेतर्फे डिजिटल अभ्यासिकेचे नुकतेच उद्घाटन झाले. श्री गुरुदेव दत्त संस्थेचे अध्यक्ष निबा दला चौधरी यांचे पूत्र कामगार आयुक्त विजय चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

भाजयुमोच्या प्रदेश उपाध्यक्षा भैरवीताई वाघ- पलांडे, पिंपळे खुर्दच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच सौ. वर्षा युवराज पाटील, पिंपळे बुद्रुकचे उपसरपंच योगेश पाटील, सदस्य संतोष चौधरी, गोकुळ पाटील, पुरुषोत्तम चौधरी आदी प्रमुख अतिथी होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डिजिटल अभ्यासिकेचे तसेच डिजिटल कक्षात एलईडी टीव्हीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तके वितरित करण्यात आले. विजय चौधरी यांच्यातर्फे विद्यार्थ्यांसाठी एलईडी टीव्ही, अभ्यासासाठी आवश्यक पुस्तके, स्पर्धा परीक्षांच्या क्लासेसच्या लिंक मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. यासोबतच अभ्यासिकेसाठी काही महत्त्वाची संदर्भ पुस्तकेही प्रदान करण्यात आली. युवराज पाटील यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी ग्रामस्थ, युवक-युवती व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खंडणीच्या गुन्ह्यात निकम यांना जामीन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अनंत निकम यांनी खंडणी मागितल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. शुक्रवार, दि. ३ जानेवारी रोजी त्यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यानंतर निकम यांनी जामीनासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने २५ हजार रूपयांच्या जातमुचलक्यावर त्यांचा जामीन मंजूर केला आहे. मात्र, दर सोमवारी पोलीस ठाण्यात हजेरी लावण्याच्या अटीवर निकम यांचा सशर्त जामीन मंजूर करण्यात आला आहे. निकम यांच्यातर्फे ॲड. सलीमखान व ॲड. आर. व्ही. निकम यांनी युक्तीवाद केला.

## अमळनेर सीसीआय कापूस खरेदी केंद्र

# नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या ८ हजारांवर

### गैरसोयीमुळे दुसरे खरेदी केंद्र सुरू करण्याची संचालकांची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बाजार समितीत सीसीआय कापूस खरेदी केंद्रात येणाऱ्या विविध समस्याबाबत शुक्रवार, दि. ३ जानेवारी रोजी विशेष सभा घेण्यात आली. या सभेत सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू आहे. मात्र, नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या आठ हजारांवर पोहोचली आहे. शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर दुसरे खरेदी केंद्र सुरू करावे, अशी मागणी संचालकांनी केली आहे.



सध्या केंद्रावर आठवड्याला केवळ सुमारे २०० शेतकऱ्यांना स्लॉट उपलब्ध आहेत. नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या कमालीची वाढली आहे. तसेच कापसाच्या दर्जासंदर्भातही आक्षेप नोंदविण्यात आला. सीसीआयने ठरवून दिलेल्या निकषांनुसार कापूस दर्जा कमी असल्याचे कारण देत ग्रेडरकडून कापूस नाकारला जातो. मात्र, तोच कापूस माल कट्टी कापून दिल्यानंतर स्वीकारला जात असल्याचे प्रकार घडत आहेत. कापसाच्या वैशिष्ट्यांचा विचार करून नवीन दर्जा निकष ठरविण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. सभेस बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पाटील, संचालक अशोक पाटील, सुभाष पाटील, भोजमल पाटील, प्रफुल्ल पवार, हिरालाल पाटील, सचिन पाटील, नितीन पाटील, भाईदास अहिरे, शरद पाटील, वृषभ पारख, प्रकाश वाणी आदी उपस्थित होते.






चौबारी (ता. अमळनेर) : युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे व्याख्यान कार्यक्रमप्रंगी प्रतिमापूजन करताना शिक्षिका, शिक्षिक व मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात अमळनेर येथील द्रौ. रा. कन्या शाळेत प्रतिमापूजन प्रसंगी उपस्थित मुख्याध्यापिका व शिक्षिका.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई लढल्या म्हणून महिला घडल्या..!

## शंभर शाळांमध्ये व्याख्यानातून जयंतीनिमित्त विविध उपक्रमांद्वारे अभिवादन...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शनिवार, दि. ३ जानेवारी रोजी युवा कल्याण प्रतिष्ठान संचलित राष्ट्रीय विचार प्रबोधन अभियानांतर्गत शंभर महिलांच्या व्याख्यानाने सावित्रीबाईंना अभिवादन करण्यात आले. अमळनेर शहर व तालुक्यातील सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांपर्यंत सावित्रीबाई फुलेंचा जीवनपट महिलांनी भाषणातून सांगितला.

शहरातील २२ हायस्कूल, ६ मराठी शाळा, ग्रामीण भागातील ५२ हायस्कूल, २० मराठी शाळा, तसेच शासकीय आश्रमशाळा सर्व मिळून १०० शाळांमध्ये जाऊन महिलांनी सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाविषयी माहिती सांगितली. महिलांनी गृहिणी, शिक्षिका, प्राध्यापिका, सामाजिक कार्यकर्त्या सेवानिवृत्त शिक्षिका व शेतकरी महिला आदींचा समावेश होता. संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय शेतकरी महिला वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्या पार्श्वभूमीवर या अभियानात शेतकऱ्यांच्या मुलींनी शिक्षण तज्ञ सावित्रीबाईंच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली. या अभिनव अभियानाच्या प्रमुख सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री भदाणे होत्या. त्यांनी १०४ महिलांशी संपर्क साधून व्याख्यानास उभे केले.

व्याख्यानांच्या अभियानाचे वैशिष्ट्ये म्हणजे या कार्यक्रमासाठी कोणाकडूनही अनुदान मिळत नाही. निधीही गोळा केला जात नाही. अत्यल्प खर्चात हजारो विद्यार्थ्यांपर्यंत महापुरुषांचे विचार पोहोचतात. हे अभियान गेल्या चार वर्षापासून नियमित सुरू आहे. या अभियानातील वक्ते कोणतेही मानधन प्रवास खर्च घेत नाहीत. दिलेल्या वेळेवर व्याख्याने होतात. प्रेरणादायी व्याख्यानातून विद्यार्थ्यांची मने जिंकली, असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अशोक पवार यांनी सांगितले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील, माजी गटशिक्षणाधिकारी अशोक बिऱ्हाडे, प्रा. डॉ. लीलाधर पाटील, बापूराव ठाकरे, संजय पाटील, सोपान भवरे, गिरीश पाटील, योगेश पाटील, डॉ. कुणाल आदींचे सहकार्य लाभले.



अमळनेर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील कार्यक्रमप्रसंगी अभिवादन करताना प्रा. डॉ. राहुल निकम, गौतम मोरे, हृदयनाथ मोरे आदी.

### डॉ. आंबेडकर वसतिगृहात अभिवादन

अमळनेर : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात अभिवादन करण्यात आले. चोपडा येथील समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राहुल निकम प्रमुख वक्ते होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकला.

वस्तीगृहाचे अधीक्षक धनंजय सपकाळे, सामाजिक कार्यकर्ते गौतम मोरे, हृदयनाथ मोरे आदी प्रमुख पाहुणे होते. श्री. सपकाळे यांनी वस्तीगृहातील विविध उपक्रमांची माहिती दिली. गौतम मोरे, हृदयनाथ मोरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. शुद्धोधन बागुल यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी युवा कल्याण प्रतिष्ठानचे प्रा. अशोक पवार यांच्या मार्गदर्शनात उपस्थितांना माहितीपत्रक वाटप करण्यात आले.

### द्रौ. रा. कन्या शाळेत प्रतिमापूजन

क्रांतीज्योती सावित्रीबाई जयंतीनिमित्त येथील द्रौ. रा. कन्या शाळेत मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते. उपमुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बाविस्कर, पर्यवेक्षक एस. पी. वाघ, जेष्ठ शिक्षक एस. एस. माळी, श्रीमती शारदा उंबराकर, कु. किर्ती सोनवणे (साने गुरुजी विद्यालय), श्रीमती आर. एस. सोनवणे यांनी प्रतिमापूजन केले. विद्यार्थ्यांना सावित्रीबाईंच्या कार्याविषयी माहिती दिली. श्रीमती सोनवणे व सौ. एस. एस. देवरे यांनी सूत्रसंचालन केले.




# वीरशैव तत्त्वदर्शन


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**तेवी लिंग गेलिया जो राहे ।**
**तो वीरशैवचि नोहे ।**
**प्राण गेलिया देह ।**
**प्रेतचि बोलिजे ॥**

श्री मन्मथशिवलिंगकृत परमरहस्य ग्रंथात मन्मथ स्वामींनी इष्टलिंग विरहित वीरशैवाला प्रेत असे म्हटले आहे. यामध्ये प्राणत्याग करण्याचा आग्रह नसून फक्त प्रेमपूर्वक निरंतर लिंग धारण करण्याचा आग्रह आहे. यापाठीमागे वीरशैवांनी निष्ठापूर्वक लिंग धारण करावे, अशी त्यांची तळमळ दिसून येते. म्हणूनच प्रत्येकाने या प्रेतकलंकापासून मुक्त होण्यासाठी विधीपूर्वक लिंग धारण केले पाहिजे.

आता आपण पाहताच ना, की एखादी वस्तू किंवा एखादा व्यक्ती स्वत:पासून दूर होताच मनुष्याला कसे प्राण गेल्यासारखा धक्का बसतो. त्याचप्रमाणे ज्याच्या लिंगावर नितांत प्रेम असते त्याचाही प्राण लिंगाचा वियोग होताच म्हणजे लिंग इष्ट लिंग आपल्यापासून दूर होताच सहज निघून जाऊ शकतो. म्हणूनच प्राणत्याग करण्याचा आग्रह नसून फक्त प्रेमपूर्वक निरंतर लिंग धारण करण्याचा आग्रह आहे.

मनुष्याकडून जेव्हा एखादा दुराचार घडतो तेव्हा तो काय करतो? सगळ्यांपासून लपून राहण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु ज्याच्या शरीरावर नेहमी सदोदित इष्टलिंग असते त्याच्या हातून दुराचार करणे शक्यच नाही. त्यामुळे आपण नेहमी सदाचाराने, सन्मार्गाने वागले पाहिजे. दररोज इष्टलिंग पूजा केली पाहिजे, इष्टलिंग धारण करण्यामागे समाजातील दुर्व्यवहाराचा लोप व्हावा, असाही एक उद्देश आहे.



# जेथे भगवान शिव यांना आरोग्यदेवता स्वरूपात पूजले जाते...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तमिळनाडूच्या नागापट्टीनम जिल्ह्यात वसलेले वैथीश्वरन कोइल मंदिर हे स्थान केवळ एक प्राचीन शिवमंदिर म्हणूनच नव्हे, तर आरोग्य, उपचार, श्रद्धा आणि गूढ आध्यात्मिक परंपरेचे एक अद्भुत केंद्र म्हणून ओळखले जाते. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांमध्ये भगवान शिव यांची विविध रूपांत पूजा होते. परंतु येथे शिव 'वैद्यनाथ' म्हणजेच रोगांवर औषध करणारा, पीडितांना आरोग्य देणारा देव म्हणून पूजले जातात. म्हणूनच हजारो वर्षांपासून हे मंदिर आजारी, निराश आणि आशावादी भक्तांचे आश्रयस्थान बनले आहे.

पौराणिक कथांनुसार देवी पार्वतींनी एकदा भगवान शिव यांच्या तिसऱ्या नेत्राविषयी जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी भगवान शिव यांनी तिसरे नेत्र उघडले आणि त्या तेजाच्या प्रभावामुळे देवी पार्वतींना पृथ्वीवर मानवी रूपात अवतरणे भाग पडले. या मानवी जीवनात त्यांना विविध शारीरिक व्याधींचा अनुभव आला. त्या वेदनादायी अवस्थेत भगवान शिव स्वतः वैद्याच्या रूपात प्रकट झाले आणि पार्वतींवर औषधोपचार करून त्यांना पूर्णतः निरोगी केले. ज्या ठिकाणी हे उपचार झाले तेच पुढे वैथीश्वरन कोइल म्हणून प्रसिद्ध झाले. या कथेमुळेच येथे शिवाची प्रतिमा केवळ संहारक किंवा तपस्वी नसून करुणामय वैद्याची बनली.



या मंदिरात प्रवेश करताच वातावरणात एक वेगळीच शांतता आणि विश्वासाची ऊर्जा जाणवते. अनेक भक्त आपापल्या आजारांच्या कथा, वैद्यकीय अहवाल, मनातील भीती घेऊन येथे येतात. काहींना दीर्घकाळ चाललेले आजार असतात, काही मानसिक तणावाने ग्रासलेले असतात, तर काहींना आधुनिक उपचारांनंतरही समाधान मिळालेले नसते. अशा वेळी वैद्यनाथाच्या चरणी केलेली प्रार्थना त्यांना मानसिक बळ देते आणि अनेकांच्या अनुभवांनुसार जीवनात सकारात्मक बदल घडवते.


मंदिरातील सिद्धामिरथम नावाचा पवित्र तलाव या श्रद्धेचा एक महत्त्वाचा भाग आहे. या तलावात स्नान करणे हे केवळ धार्मिक कृत्य नसून उपचार प्रक्रियेचा एक भावनिक टप्पा मानला जातो. तलावाच्या पाण्यात गूळ मिसळण्याची परंपरा विशेष अर्थपूर्ण आहे. जीवनातील कटुता, वेदना, आजार हे जसे गोडपणात विरघळून जावेत, तशीच भावना या विधीतून व्यक्त होते. श्रद्धाळू असे मानतात, की हा विधी केवळ शरीराला नाही, तर मनालाही शुद्ध करतो.

वैथीश्वरन कोइल मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नवग्रहांशी असलेला त्याचा निकटचा संबंध, विशेषतः मंगळग्रहाशी. ज्यांच्या जन्मपत्रिकेत मंगळ दोष आहे, ज्यांना अपघात, रक्ताशी संबंधित आजार, शस्त्रक्रिया किंवा मानसिक अस्थैर्याचा त्रास आहे ते येथे विशेष पूजा करतात. मंगळग्रहाचा उग्र प्रभाव येथे शांत होतो, अशी भक्तांची ठाम श्रद्धा आहे. त्यामुळे वैवाहिक अडचणी, आरोग्य समस्या किंवा जीवनातील अडथळे दूर व्हावेत म्हणून अनेक जण येथे नियमितपणे येतात.

या मंदिराची कीर्ती केवळ आरोग्यदेवतेपुरती मर्यादित नाही, तर येथील प्राचीन नाडी ज्योतिषामुळेही हे स्थान जगभरात ओळखले जाते. असे सांगितले जाते, की हजारो वर्षांपूर्वी सिद्ध ऋषींनी मानवाच्या जीवनातील घटनांचा तपशील ताडपत्रांवर लिहून ठेवला. आजही येथे अंगठ्याच्या ठशांच्या आधारे योग्य ताडपत्र शोधले जाते आणि त्या व्यक्तीचे भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य उलगडले जाते. अनेक लोकांना या वाचनात त्यांच्या जीवनातील अचूक घटना, नावे, समस्या आणि उपाय सांगितले गेले, असे अनुभव ऐकायला मिळतात. त्यामुळे विज्ञान, श्रद्धा आणि गूढतेचा हा संगम लोकांना थक्क करून टाकतो.

वैथीश्वरन कोइल हे मंदिर त्यामुळे केवळ दर्शनाचे ठिकाण न राहता जीवनाला दिशा देणारे केंद्र बनले आहे. येथे येणारा प्रत्येक भक्त काहीतरी वेगळे घेऊन परत जातो. कोणी आशा, कोणी धैर्य, कोणी मानसिक शांती, तर कोणी प्रत्यक्ष अनुभवलेली आरोग्यप्राप्ती. वैद्यनाथाच्या या पवित्र भूमीत उभे राहिल्यावर माणसाला असे वाटते, की देव केवळ पूजेसाठी नसून, तो आपल्या वेदना ऐकणारा आणि योग्य वेळी उपचार करणारा सखा आहे. अशाच श्रद्धेवर आणि अनुभवांवर उभे राहिलेले वैथीश्वरन कोइल आजही लाखो लोकांसाठी रोगमुक्तीची, विश्वासाची आणि आध्यात्मिक समाधानाची दीपशिखा बनून उजळत आहे.

# भगवान शिव परमात्मा सर्वव्याप्तच!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिव परमात्मा हे सर्वत्र व्याप्त आहेत. भगवान शिव यांचे सगुण-साकार रूपातील एकदेशीय ध्यानच सगळ्यांना आवडते. अशा सगुण साकार ईश्वरतत्त्वाला आपण आवाहन करून त्याची पूजा करतो, हेच भक्तीचे एक लक्षण आहे. म्हणूनच म्हटले आहे, की 'सर्वगत तुझे राहू तुझं पाशी आम्हा एकदेशी आवडे ध्यान...' कोणताही भक्त असो, तो ईश्वराचा सुगंध साकारूपाची पूजा करतो आणि आपल्या इष्टदेवतेचे संदर्भ त्यांच्या डोळ्यासमोर असते. तो साधक म्हणून भावाने आपल्या इष्टदेवतेला आव्हान करतो आणि पूजन करतो. भस्म रुद्राक्ष असलेली सगुण-साकार भगवान शंकराची मूर्ती आहे जेव्हा भक्ताच्या समोर दिसते तेव्हा तू आपल्या शंकराला नमन करतो. हेही एक भक्तीचे लक्षण आहे.

जर एखादा साधक संकटात अडकलेला असेल, तर भगवान शिव त्याच्या संकटात धावून जातात. जेथे भक्ताला गरज पडते तेथे भगवान शिव धावतच असतात. भगवान शिव अतिशय मायाळू असून,



भक्ताबदल त्यांच्या मनात अतिशय कणव आहे. भगवान शिव हे आपले पालनकर्ते आहेत, रक्षणकर्ते आहेत. भगवान शंकर यांचे स्वरूप म्हणून रुद्राक्ष शुभ पवित्र आणि कल्याणकारी मानला जातो आणि तो भगवान शिव यांना अतिशय प्रिय आहे. त्यामुळे मोठ्या संकटातून सुटका होण्यासाठी केला जाणारा महामृत्युंजय जप रुद्राक्ष माळेवरच केला जातो. रुद्राक्ष एक अद्भुत शक्ती असल्यामुळे साधू-संतांकडून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.

**भगवान शिव यांना त्रिदल बेल प्रिय**

त्रिदल बेल म्हणजे सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे प्रतीक आहे. हे तिन्ही गुण भगवान शिव यांना अर्पण करून जो समर्पण बुद्धीने भगवंताचे कार्य करतो त्या साधकावर भगवान शिव संतुष्ट होतात.

----

# शिव सहस्त्रनाम स्तोत्रम्

## अर्थासह मराठी भावार्थानुसार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**२१) घोरो महातपाः पाशो नित्यो गिरिरुहो नभः।**
**सहस्रहस्तो विजयो व्यवसायो ह्यतन्द्रितः॥**
**अर्थ :** घोर, अत्यंत भयानक रूपधारी, महातपाः महान तपस्वी, पाशः बंधन-विनाशक, गिरिरुह कैलासवासी, सहस्रहस्त, सर्व कर्मशक्ती धारण करणारे, विजय अजेय, अतंद्रित, कधी न थकणारे.
**भावार्थ :** भगवान शिव भयाचेही शमन करतात. त्यांची घोरता ही अज्ञानावर प्रहार करणारी आहे, तर तपस्वीपणा हे ज्ञानाचे स्वरूप आहे. ते कर्मयोगाचे आदर्श आहेत. सतत कार्यशील, सजग आणि अजेय.

**२२) अधर्षणो धर्षणात्मा यज्ञहा कामनाशकः।**
**दक्षयागापहारी च सुसहो मध्यमस्तथा॥**
**अर्थ :** अधर्षण, ज्यांना कोणी पराजित करू शकत नाही. यज्ञ हा अहंकारयुक्त यज्ञ नष्ट करणारे, कामनाशक, विषयवासनेचा नाश करणारे, सुसह सहनशील, मध्यम संतुलित.
**भावार्थ :** भगवान शिव हे संतुलनाचे प्रतीक आहेत. ते अधर्माचा नाश करतात. पण करुणेने, अहंकाराशिवाय. दक्षयज्ञविघटन हे त्यांचे तत्त्वज्ञान ' अहंकारविरहित यज्ञच खरा यज्ञ आहे. '

**२३) तेजोपहारी बलहा मुदितोऽर्थोऽजितोऽवरः।**
**गम्भीरघोषा गम्भीरो गम्भीरबलवाहनः॥**
**अर्थ :** तेजोपहारी तेज देणारे, बलहा अधर्माचे बल हरण करणारे, मुदित सदैव आनंदी, अजित अजिंक्य, गंभीर स्थिर, बलवाहन शक्तिशाली.
**भावार्थ :** भगवान शिव यांचे तेज शांतीचे आहे. उग्र नव्हे तर स्फूर्तिदायक. त्यांचे हास्यही निर्मळ आहे. ते मनातील अस्थिरता दूर करून संयम व आनंद शिकवितात.

**२४) न्यग्रोधरूपो न्यग्रोधो वृक्षपर्णस्थितिर्विभुः।**
**सुतीक्ष्णदशनश्चैव महाकायो महाननः॥**
**अर्थ :** न्यग्रोधरूप वटवृक्षसमान, सुतीक्ष्णदशन तीक्ष्ण बुद्धीचे, महाकाय विशाल शरीराचे, महानन तेजस्वी मुखवाले.
**भावार्थ :** वटवृक्षासारखे भगवान शिव आश्रयदायी व चिरंतन. त्यांची तीक्ष्णता म्हणजे विवेकशक्ती, त्यांची विशालता म्हणजे क्षमाशीलता. ते छायेसारखे विश्वाचे रक्षण करतात.

**२५) विष्वक्सेनो हरिर्यज्ञः संयुगापीडवाहनः।**
**तीक्ष्णतापश्च हर्यश्वः सहायः कर्मकालवित्॥**
**अर्थ :** विष्वक्सेन. सर्व दिशांचे रक्षण करणारे, हरि, पालनकर्ते, यज्ञ कर्मयोगाचे स्वरूप, हर्यश्व, तेजगती, कर्मकालवित् योग्य काळात कार्य करणारे.
**भावार्थ :** भगवान शिव यज्ञस्वरूप आहेत. कर्माची दिव्यता ते शिकवितात. ते कालाचे अधिपती आहेत म्हणून सर्वकाळ योग्यतेचा धडा देतात. त्यांच्या सहाय्यानेच धर्म, कर्म आणि विज्ञान संतुलित राहते.

**२६) विष्णुप्रसादितो यज्ञः समुद्रो वडवामुखः।**
**हुताशनसहायश्च प्रशान्तात्मा हुताशनः॥**
**अर्थ :** विष्णुप्रसादित विष्णूने ज्यांना वंदन केले, यज्ञ देवपूजक, समुद्रज्ञानाचा अथांग सागर, प्रशान्तात्मा, पूर्ण शांतचित्त, हुताशन, अग्नितत्त्वस्वरूप.
**भावार्थ :** भगवान शिव हे ज्ञानसागर आहेत. जे विष्णूंसाठीही वंदनीय आहेत. ते अग्नितत्त्व आहेत. पवित्रता आणि परिवर्तनाचे अधिष्ठान. त्यांची शांती आणि स्थिरता हे योगींसाठी सर्वोच्च ध्येय.

**२७) उग्रतेजा महातेजा जन्यो विजयकालवित्।**
**ज्योतिषामयनं सिद्धिः सर्वविग्रह एवच॥**
**अर्थ :** उग्रतेजा, प्रचंड तेजस्वी, जन्य, सृष्टीचे उत्प्रेरक, विजयकालवित् काळाचे तत्त्व जाणणारे, सर्वविग्रह, सर्व रूपांमध्ये व्यापलेले.
**भावार्थ :** भगवान शिव यांचे तेज भयावह नाही, ते परिवर्तनकारी आहेत. ते सृष्टीच्या गतीला नियंत्रित करणारे ' कालेश्वर ' आहेत. त्यांचे अस्तित्व सर्व रूपांत आहे ज्यात प्रकाश व अंधकार दोन्ही सामावले आहेत.

**२८) शिखी मुण्डी जटी ज्वाली मूर्तिजो मूर्धगो बली।**
**वेणवी पणवी ताली खली**
**कालकटङ्कटः॥**
**अर्थ :** शिखी, अग्निरूपी, मुण्डी, मुण्डमालाधारी, जटी, जटाधारी, वेणवी, बासरीधारी, ताली, ताल-लयप्रिय, कालकटङ्कट, कालाला जिंकणारे.
**भावार्थ :** भगवान शिव यांची विविध रूपे ही सृष्टीच्या विविध शक्तींचे प्रतीक आहेत. ते नृत्य, संगीत, अग्नी आणि योग यांचे अधिपती आहेत. ते कालावर विजय मिळवितात म्हणून ' महाकाल '.

**२९) त्रविग्रहमतिर्गुणबुद्धिर्लयो**
**गमः।**
**प्रजापतिर्विश्वबाहुर्विभागः**
**सर्वगोमुखः॥**
**अर्थ :** नक्षत्रविग्रह, ज्यांच्या शरीरात नक्षत्रे स्थित, गुणबुद्धी, सत्त्व, रज, तम या तिन्ही गुणांचे ज्ञाता,
प्रजापती, सृष्टीचा स्वामी, विश्वबाहू, विश्वाला आलिंगन देणारे.
**भावार्थ :** भगवान शिव यांचे शरीर म्हणजे विश्वाचा नकाशा आहे. ते सर्व नक्षत्र, ग्रह, काल व तत्त्वांचे नियंता आहेत. त्यांच्या बाहूंमध्ये सर्व जगाला शरण मिळते.

**३०) विमोचनः सुसरणो हिरण्यकवचोद्भवः।**
**मेढ्रजो बलचारी च महीचारी स्रुतस्तथा॥**
**अर्थ :** विमोचन, बंधनमुक्त करणारे, सुसरण, योग्य मार्ग दाखविणारे, हिरण्यकवचोद्भव, सुवर्ण तेजाचे मूळ, बलचारी, बलातीत, महीचारी, भूमीवर विहरणारे.
**भावार्थ :** भगवान शिव मुक्तीचे अधिष्ठान आहेत. ते जीवाला अज्ञानाच्या बंधनातून सोडवितात. त्यांचे तेजस्वी तेज हिरण्यकवचासारखे सर्वदिशांनी झळकते. ज्ञान, संयम आणि करुणा यांनी अलंकृत.

**३१) सर्वतूर्यनिनादी च सर्वातोद्यपरिग्रहः।**
**व्यालरूपो गुहावासी गुहो माली तरङ्गवित् ॥**
**अर्थ :** सर्वतूर्यनिनादी सर्व संगीत वाद्यांचा निनाद ज्यांच्यात आहे, सर्वतोद्यपरिग्रह , प्रत्येक स्वरात व्यापलेले, व्यालरूप, सर्पाचे प्रतीक धारण करणारे, गुहावासी, अंतर्मनातील गुहेत वास करणारे, तरंगवित् चेतनेच्या लहरी जाणणारे.
**भावार्थ :** भगवान शिव म्हणजे आद्य नाद. त्यांच्या डमरूचा निनाद हेच विश्वाचे स्पंदन आहे. ते अंतःकरणाच्या गुहेत वसलेले आहेत. जेव्हा साधक अंतर्मुख होतो तेव्हा त्या नादाचा अनुभव होतो.



**३२) त्रिदशस्त्रिकालधृक्कर्मसर्वबन्धविमोचनः।**
**बन्धनस्त्वसुरेन्द्राणां युधि शत्रुविनाशनः॥**
**अर्थ :** त्रिदश सर्व देवतांचे अधिपती, त्रिकालधृक् भूत, वर्तमान आणि भविष्य जाणणारे, सर्वबन्धविमोचन मुक्तिदाता, शत्रुविनाशन, अधर्माचा नाश करणारे.
**भावार्थ :** भगवान शिव त्रिकालज्ञ आहेत. त्यांचा काळावर अधिकार आहे. ते भक्तांना सर्व बंधनांतून मुक्त करतात. त्यांची करुणा मुक्ती देते आणि त्यांचा कोप अधर्माचा नाश करतो.

**३३) साङ्ख्यप्रसादो दुर्वासाः सर्वसाधुनिषेवितः।**
**प्रस्कन्दनो विभागज्ञो अतुल्यो यज्ञभागवित् ॥**
**अर्थ :** सांख्यप्रसाद ज्ञान आणि संतुलनाचे अधिष्ठान, दुर्वासा, तपश्चर्येचे स्वरूप, सर्वसाधुनिषेवित, संतांच्या पूजनीय, अतुल्य, अद्वितीय.
**भावार्थ :** भगवान शिव हे ज्ञानयोग आणि संन्यास यांचे संतुलन आहेत. ते दुर्वासा म्हणून तपस्वी, तर शंकर म्हणून करुणामूर्ती. साधकांना ते यज्ञफळ आणि योगफल दोन्ही देतात.

**३४) सर्ववासः सर्वचारी दुर्वासा**
**वासवोऽमरः।**
**हैमो हेमकरो यज्ञः सर्वधारी धरोत्तमः॥**
**अर्थ :** सर्ववास, सर्वत्र वास करणारे, दुर्वासा, अंतर्मनात वास करणारे तपस्वी, हेमकर, सुवर्णतेजाने युक्त, सर्वधारी, सर्व तत्त्वांचा आधार.
**भावार्थ :** भगवान शिव सर्वत्र व्यापले आहेत. अणूपासून ब्रह्मांडापर्यंत ते सोन्यासारखे तेजस्वी पण अलिप्त. त्यांचे अस्तित्व सर्व जीवांना पोषण देणारे आहे.

**३५) लोहिताक्षो महाक्षश्च विजयाक्षो**
**विशारदः।**
**सङ्ग्रहो निग्रहः कर्ता सर्पचीरनिवासनः॥**
**अर्थ :** लोहिताक्ष, लाल तेजस्वी नेत्र असलेले, महाक्ष, महान दृष्टी, विजयाक्ष, विजयी दृष्टिकोन असलेले, सर्पचीरनिवासन, सर्पवस्त्रधारी.
**भावार्थ :** भगवान शिव यांचे लाल नेत्र हे जागृतीचे प्रतीक आहेत. त्यांची दृष्टी सर्वकाळ ज्ञानदायी आहे. ते भोग आणि भय या दोन्हींवर विजय मिळवून आत्मज्ञानाचे वस्त्र धारण करतात.

**३६) मुख्योऽमुख्यश्च देहश्च काहलिः सर्वकामदः।**
**सर्वकासप्रसादश्च सुबलो बलरूपधृत्॥**
**अर्थ :** मुख्य, सर्वश्रेष्ठ, सर्वकामद, सर्व इच्छांची पूर्तता करणारे, सुबल, दिव्य सामर्थ्याचे मूर्त रूप.
**भावार्थ :** भगवान शिव हे इच्छापूर्तीचे मूळ आहेत. परंतु त्या इच्छा आत्मोन्नतीकडे नेणाऱ्या असतात. त्यांचे बल म्हणजे सत्य आणि श्रद्धा. जो त्यांना संपूर्ण हृदयाने स्मरतो त्याच्या सर्व कामना सत्यरूप होतात.

**३७) सर्वकामवरश्चैव सर्वदः सर्वतोमुखः।**
**आकाशनिर्विरूपश्च निपाती ह्यवशः खगः॥**
**अर्थ :** सर्वकामवर, सर्व इच्छांचे वरदान देणारे, सर्वदः, सर्व काही दान करणारे, आकाशनिर्विरूप, आकाशासारखे अनाकार, खग, स्वच्छंदी आत्मस्वरूप.
**भावार्थ :** भगवान शिव आकाशासारखे निराकार आहेत. ते भक्तांच्या इच्छा पूर्ण करतात. पण त्यांना आसक्तीपासून मुक्तही करतात. ते उडणाऱ्या पक्ष्यासारखे स्वच्छंदी आणि अनंत आकाशासारखे विशाल आहेत.

**३८) रौद्ररूपोंऽशुरादित्यो बहुरश्मिः सुवर्चसी।**
**वसुवेगो महावेगो मनोवेगो निशाचरः॥**
**अर्थ :** रौद्ररूप, संहाररूप, आदित्य, सूर्यस्वरूप, बहुरश्मी, असंख्य किरणांनी व्यापलेले, मनोवेग, विचारांच्या गतीसमान वेगवान.
**भावार्थ :** भगवान शिव सूर्याचे तेज आहेत आणि रौद्रतेतूनही कल्याण करतात. ते मनाच्या वेगाएवढेच चेतनाशक्तीचे प्रतीक आहेत. त्यांचे रौद्ररूप भयावह नाही. ते अज्ञानाचा नाश करणारे प्रकाश आहेत.

**३९) सर्ववासी श्रियावासी उपदेशकरोऽकरः।**
**मुनिरात्मनिरालोकः सम्भग्नश्च सहस्रदः॥**
**अर्थ :** सर्ववासी, सर्वत्र उपस्थित, श्रिया-वासी, लक्ष्मीच्या तेजात वास करणारे, उपदेशकर, धर्ममार्गदर्शक, मुनिरात्मनिरालोक, आत्मज्ञानाने प्रकाशित, सहस्रद, असंख्य आशीर्वादांचा स्रोत.
**भावार्थ :** भगवान शिव गुरू आहेत. ते आत्मज्ञानाचा दीप लावतात. ते सर्वत्र वास करतात. श्री आणि वैराग्य दोन्हींचे संतुलन ठेवतात. त्यांचा उपदेश म्हणजे आत्मजागृतीची वाट.

**४०) पक्षी च पक्षरूपश्च अतिदीप्तो विशाम्पतिः।**
**उन्मादो मदनः कामो ह्यश्वत्थोऽर्थकरो यशः॥**
**अर्थ :** पक्षी मुक्त आत्मा, अतिदीप्त प्रखर तेजस्वी, विशाम्पती लोकांचे पालनकर्ता, काम प्रेमाचे मूर्त स्वरूप, अश्वत्थ चिरंतन वृक्षासमान स्थिर.
**भावार्थ :** भगवान शिव हे प्रेमाचे दैवत आहेत. ते मुक्ती आणि स्थैर्य या दोन्हींचे द्योतक आहेत. अश्वत्थासारखे ते चिरंतन आहेत, तर प्रेमरूप कामस्वरूपात ते सृष्टीचा पोषण करतात. **(क्रमशः)**

**(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)**